**<u>फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४ ची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः संकेश विलास गवाळे,

वयः २० वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः सुडकोली, ता.रोहा, जि.रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :</u>**

०१. सुडपोली येथे मी माझ्या कुटूंबासोबत राहतो. मला दि.२१.१२.२०१८ रोजीच्या घटनेबाबत माहिती नाही. पोलीसांनी माझेकडे चौकशी करून माझे बयान नोंदविले नव्हते.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे मला माहिती नाही की, दि.२१.१२.२०१८ रोजी सायंकाळी ७.०० वाजताच्या दरम्यान आमचे गावातील दुर्गा मंदिराच्या आवारात सोमेश धुमक म्हणजेच आरोपी आला होता, त्याने फिर्यादी कौशल भालचंद्र ढवुळकर याला बघून तुझ्यात दम असेल तर ये, आता तुला व तुझ्या बापाला मारण्याची माझी धमक आहे, त्यावेळी फिर्यादींनी आरोपीस त्याला व त्याचे वडिलांना मारण्याची भाषा का करतो असे म्हणटे असता, आरोपीने फिर्यादीचे गालावर व नाकावर हातातील कडयाने मारहाण केली होती, या बाबी घडल्या होत्या किंवा

कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दोघांची सोडवासोडव केली होती, त्यावेळी आरोपीने फिर्यादीला तु आता संपलास, तु कंपनीतुन एकटा येतोस ना अशी धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीसांनी मला विचार केली होती व माझे बयान नोंदविले होते.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी व आरोपी एकाच गावामध्ये राहतो, मी त्याला चांगल्या प्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपीला वाचविण्याकरिता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी. एच. पाटकर यांनी नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.09.06 15:16:35 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि.०६.०९.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.